# मुंबईत मोठा एसआरए घोटाळा; 47 जणांकडून तब्बल 5.57 कोटी लाटले

## कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार समोर आला

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**मुंबई:** मुंबईत मोठा SRA घोटाळा समोर आला आहे. ४७ जणांची तब्बल ५.५ कोटींची फसवणूक झाली. या प्रकरणात एका आमदाराच्या पीएचाही समावेश असल्याचे कळते.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत (एसआरए) प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव असलेली घरे मिळवून देतो, असे सांगून कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. चार ते पाच एजंटनी एसआरए अधिकाऱ्यांशी चांगली ओळख असल्याचे भासवून ४७ जणांकडून साडेपाच कोटी




उकळले. चार एजंटविरोधात निर्मलनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये एसआरएच्या एका निवृत्त अधिकाऱ्याचा समावेश आहे. घरांची खरेदी-विक्री करणाऱ्या एजन्सीच्या दिलेल्या तक्रारीनुसार, ही कारवाई करण्यात आली आहे. एजन्सीचे कार्यालय सांताक्रूझ येथे आहे. त्यांच्या कार्यालयात घरे खरेदी-विक्रीचा व्यवसाय करणारा एक एजंट आला. त्याला एजन्सीचालकाने एसआरएतील घरांबाबत विचारणा केली. त्यावर एसआरएचे एजंट आणि निवृत्त अधिकारी राखीव घरे मिळवून देत असल्याचे त्याने सांगितले. त्याने एजन्सीचालकांची निवृत्त अधिकारी आणि एसआरए एजंटसोबत भेट घडवून आणली. एजंटनी परिसरानुसार घरांचे दर दिले. एजन्सीचालकांनी ४७ ग्राहकांना माहिती दिली. काहींनी पूर्ण, तर काहींनी आगाऊ रक्कम एजन्सीकडे जमा केली. एजन्सीचालकांनी पाच कोटींपेक्षा अधिक रक्कम एजंटना दिली.

एसआरएसाठी पुरावे, इतर कागदपत्रे या एजंट मंडळींनी दिली. मात्र घरांचा ताबा मिळत नसल्याने एजन्सी आणि ग्राहकांनी एसआरए कार्यालयात जाऊन चौकशी केली असता, ही कागदपत्रे बनावट असल्याचे दिसून आले, अशी माहिती पोलिसांनी दिली.

### आमदाराच्या 'पीए'चाही सहभाग?

» पैसे देऊनही घरे मिळत नसल्याचे पाहून सर्वांनी एजंटकडे पैसे परत मिळण्यासाठी तगादा लावला. त्यावेळी पश्चिम उपनगरातील एका आमदाराचा स्वीय सहायक आपले काम करून देणार असल्याचे एजंटनी सांगितले. त्यांनी या 'पीए'ची भेटही घडवून आणली. ' पीए 'ने घरे मिळवून देण्यासाठी २५ लाख रुपयांची मागणी केली. यातील काही रक्कम त्यांना देण्यात आली, मात्र त्यांनीही फसविल्याचा आरोप तक्रारीत आहे.

# ठाणे-भिवंडी मार्गावर भीषण अपघात; खड्ड्यामुळे दुचाकी घसरून महिलेचा मृत्यू!

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**मुंबई:** एकीकडे विकास कामाचा गाजावाजा करायचा अन् रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांमुळे निष्पाप नागरिकाचे जीव जात आहे. आता पुन्हा एकदा ठाणे-भिवंडी मार्गावर खड्डा चुकवत असताना स्कुटर घसरली आणि दाम्पत्य खाली कोसळले. त्याच वेळी पाठीमागून येणाऱ्या ट्रकखाली सापडून महिलेचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या मार्गावर असणाऱ्या जीवघेण्या खड्डयाने एका महिलेचा बळी गेल्याची घटना घडली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत महिलेच्या स्कूटरमध्ये सुनीता अक्षयलाल पाल (४६) या ठाण्यातील मनोरमानगर भागातील रहिवासी होत्या. रविवारी दुपारी त्या त्यांचे पती अक्षयलाल पाल यांच्यासोबत दुचकीवरुण



येथून अंजूरफाटा भागातील भिवंडीला जात असत. दुपारी सुमारे १ वाजता त्यांची दुचाकी रहाणाळ परिसरात पोहोचली असता, त्यांच्या दुचाकीची समोरून येणाऱ्या ट्रकशी धडक झाली. या धडकेमुळे सुनीता पाल रस्त्यावर पडल्या आणि ट्रकची चाके त्यांच्या डोक्यावरून गेली सुनीता गंभीर जखमी झाल्या आणि त्यांचा मृत्यू झाला. या अपघातात अक्षयलाल पाल जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाला.

सुनीता आणि त्यांचे पती अक्षयलाल पाल भिवंडीच्या अंजूर फाटा भागातील फ्लॅट पाहण्यासाठी दुचकीवरुण येथे आले होते. घटनेची माहिती मिळताच नरपोली पोलीस घटनास्थळी पोहोचले. पंचनामा केल्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी भिवंडी उपजिला रुग्णालयात पाठवण्यात आला. नरपोली पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# धर्मस्वातंत्र्यावर शिक्कामोर्तब! विधेयकावर राष्ट्रपतींची मोहोर; तुरुंगवास अन् दंडाचीही कायद्यात तरतूद



प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**मुंबई :** आता बेकायदा धर्मांतराच्या प्रकरणांमध्ये नव्या कायद्यातील तरतुदींनुसार कठोर कायदेशीर कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्यात जबरदस्तीने आणि आमिष दाखवून होणारे धर्मांतर रोखण्यासाठी राज्य विधिमंडळाने मंजूर केलेला धर्मस्वातंत्र्य कायदा आता राज्यात लागू झाला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी मिळाल्यानंतर आणि अधिकृत राजपत्रात (गॅझेट) प्रकाशित झाल्यानंतर राज्यात धर्मांतरविरोधी 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा, २०२६' लागू झाला आहे. ३० जुलै रोजी अधिकृत राजपत्रात प्रकाशित झाल्यापासून हा कायदा आता अंमलात आला आहे. राज्यात जबरदस्तीने धर्मांतर केले जात असल्याच्या तक्रारी सरकारकडे आल्या होत्या. या अनुषंगाने उपाययोजना सुचवण्यासाठी; तसेच इतर राज्यातील कायद्यांचा अभ्यास करण्यासाठी व कायदेशीर बाबींचा अभ्यास करून कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी राज्य सरकारने तत्कालीन पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली १४ फेब्रुवारी २०२५ रोजी विशेष समिती स्थापन केली होती. या समितीने २६ फेब्रुवारी २०२६ रोजी 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम, २०२६'चा मसुदा सरकारकडे सादर केला होता. समाजाला दहशतीखाली ठेवण्याचा हा प्रयत्न असल्याचा दावा करण्यात आला होता. धर्मांतर करणाऱ्या व्यक्तीला सरकारला आगाऊ याची माहिती देणे बंधनकारक असल्याने अशा व्यक्तींची माहिती सार्वजनिक होऊन त्यांना त्रास देता येईल, असाही धोका विरोधकांकडून व्यक्त करण्यात आला होता. तसेच अल्पसंख्यांक या कायद्याला न्यायालयात आव्हान देणार असल्याची घोषणा वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी रविवारी केली. कुणी कुठल्या देवाला, संताला मानायचे हा सरकारच्या परवानगीचा विषय नाही. राज्यघटनेचे कलम २५ आणि २६ हे धर्म आणि उपासनेचे स्वातंत्र्य देते. धर्म हा काही सरकारच्या नियंत्रणाखाली नाही, त्यामुळे या कायद्याला न्यायालयात आव्हान देऊ असे आंबेडकर यांनी स्पष्ट केले.

सध्या देशातील १२ राज्यांमध्ये हा कायदा असून ओडिशा राज्यात १९६७ साली तो मंजूर करण्यात आला. त्यानंतर मध्य प्रदेश, छत्तीसगढ, अरुणाचल प्रदेश, गुजरात, हिमाचल प्रदेश, झारखंड, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि हरयाणा या राज्यात तो मंजूर करण्यात आला आहे.

# जुलैमध्ये पावसाचा दिलासा, शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद, पण ऑगस्टमध्ये काय होणार?

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**मुंबई :** उजनी व वीर धरणाच्या पाणलोट क्षेत्रामधील सततच्या पावसामुळे धरणाच्या पाणी पातळीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी उजनी व वीर धरणातून विसर्ग सोडण्यात आला आहे. चंद्रभागा नदीपात्रातून सायंकाळी ५ वाजता १ लाख ५ हजार ९७ क्यूसेक्सने पाण्याचा प्रवाह सुरू असून चंद्रभागा नदीने पाण्याची इशारा पातळी ओलांडली आहे. 'एल निनो'च्या काळात बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या प्रणालींनी यंदा राज्याला, तसेच धरणक्षेत्रालाही दिलासा दिला आहे. जूनमध्ये राज्याच्या अनेक भागांत मान्सूनने निराशा केल्यानंतर जुलै महिन्यात मात्र पावसाने जोरदार पुनरागमन केले. भारतीय हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार, १ ते ३१ जुलै या कालावधीत राज्यात सरासरीच्या तुलनेत ४० टक्के अधिक पावसाची नोंद झाली. राज्यात सरासरी ३२४.२ मिलीमीटर पावसाऐवजी ४५४.२ मिलीमीटर पाऊस झाला. बंगालच्या उपसागरातील प्रणालींचा फायदा मध्य महाराष्ट्राला सर्वाधिक झाला असून मध्य महाराष्ट्रात ७२ टक्के अतिरिक्त पाऊस झाला. कोकण-गोवा विभागात ३३ टक्के अधिक पाऊस नोंदला गेला. गोव्यामध्ये अजूनही पावसाची तूट असल्याने या तुटीचा परिणाम कोकण-गोवा विभागाच्या आकडेवारीवर झाला आहे अन्यथा कोकण विभागामध्ये सिंधुदुर्ग वगळता इतर जिल्ह्यांना दिलासा मिळाला आहे. यामध्ये मुंबई शहर आणि उपनगरांसह, पालघर जिल्ह्याचाही समावेश होतो. पालघरमध्ये सरासरीपेक्षा ६१ टक्के अतिरिक्त पाऊस नोंदला गेला आहे. विदर्भात २१ टक्के, तर मराठवाड्यात १७ टक्के अतिरिक्त पावसाची नोंद झाली. त्यामुळे राज्यातील चारही विभागांमध्ये जुलै महिन्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्याचे दिसत आहे. राज्यात नाशिक जिल्ह्याला जुलैच्या पावसाने फायदा झाला. नाशिक जिल्ह्यात सरासरी २९४.५ मिलीमीटर पावसाच्या तुलनेत ७९०.८ मिलीमीटर पाऊस झाला. तो १६९ टक्के अधिक आहे. त्यापाठोपाठ पुणे जिल्ह्यात १२९ टक्के, पालघरमध्ये १२४ टक्के अतिरिक्त पावसाची नोंद झाली. मुंबई उपनगरात ७४ टक्के, मुंबई शहरात ६० टक्के, रायगडमध्ये ५७ टक्के, ठाणे जिल्ह्यात ५३ टक्के, धुळे जिल्ह्यामध्ये ५३ टक्के, जळगावमध्ये ४९ टक्के आणि अहिल्यानगरमध्ये ४८ टक्के अधिक पाऊस झाला. यामुळे धरण क्षेत्रालाही फायदा झाल्याचे दिसते. राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये समाधानकारक पाऊस झाला असला, तरी सिंधुदुर्ग जिल्ह्यात उणे २७ टक्के, नंदुरबार जिल्ह्यात उणे २३ टक्के पाऊस नोंदला गेल्याने या दोन जिल्ह्यांमध्ये पावसाची लक्षणीय तूट कायम राहिली. यासोबतच सोलापूर १७ टक्के, बीड सहा टक्के आणि हिंगोलीमध्ये ५ टक्के तूट नोंदली गेली. सहा ऑगस्टपर्यंतच्या कालावधीत पश्चिम विदर्भ, मराठवाड्याचा काही भाग, तसेच उत्तर मध्य महाराष्ट्राचा काही भाग येथे पावसाचे सातत्य राहू शकते. त्यामुळे पावसाची ही स्थिती आणखी सुधारेल, अशी शक्यता आहे. सहा ते १३ ऑगस्ट या काळात मात्र कोकण, विदर्भ येथे सरासरीहून कमी पावसाची शक्यता आहे.

# हरवलेला मोबाईल मिळताच रिक्षाचालकाने केला परत!

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

मुंबई: आजच्या धावपळीच्या जीवनात प्रामाणिकपणा आणि सामाजिक जबाबदारी जपणाऱ्या अनेक व्यक्तींची उदाहरणे समाजासमोर येत असतात. अशाच एका कौतुकास्पद घटनेत जगदूशा नगर रिक्षा स्टँडवरील रिक्षाचालक समीर सकपाळ यांनी आपल्या प्रामाणिकपणाचा आदर्श घालून दिला. अमृतनगर ते घाटकोपर रेल्वे स्थानक असा प्रवास करताना एका प्रवाशाचा ओप्पो कंपनीचा मोबाईल ऑटो रिक्षामध्येच विसरला गेला. प्रवास पूर्ण झाल्यानंतर काही वेळाने संबंधित प्रवाशाच्या लक्षात मोबाईल हरवल्याचे आले. त्यानंतर प्रवाशाने आपल्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मोबाईलवर संपर्क होताच रिक्षाचालक



समीर सकपाळ यांनी तात्काळ प्रतिसाद दिला. त्यांनी प्रवाशाला जगदूशा नगर रिक्षा स्टॅन्ड येथे येण्यास सांगितले. त्यानंतर कोणतीही अपेक्षा न ठेवता त्यांनी प्रवाशाचा मोबाईल सुखरूप परत केला. रिक्षाचालक समीर सकपाळ यांच्या या प्रामाणिक कृतीमुळे संबंधित प्रवाशाने त्यांचे मनापासून आभार मानले. हरवलेला मोबाईल कोणतीही अपेक्षा न ठेवता परत केल्याने परिसरातील नागरिकांकडूनही त्यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करण्यात येत आहे.

# मुंबई महापालिकेत नोकरीची सुवर्णसंधी; 473 पदे भरणार

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**मुंबई:** मुंबई महानगरपालिकेत नोकरी करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. मुंबई महानगरपालिकेच्या ४७३ वाहन चालकांची भरती प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन आणि घनकचरा व्यवस्थापन विभागातील ४७३ चालकांची भरती प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे अनेक तरुणांना महानगरपालिकेत काम करण्याची संधी मिळाली आहे.

गेल्या दोन वर्षांपासून, मुंबई महानगरपालिकेतील वाहन चालकांची रिक्त पदे भरण्यासाठी महानगरपालिका कर्मचारी कार्यकर्त्यांच्या संघटनेकडून



सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. अखेर, त्यांच्या संघटनेने प्रसिद्धी मिळवली आहे. चालकाचे पद रिक्त असल्याने कार्यरत चालकांवर अतिरिक्त ताण येत आहे. यामुळे, महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांना विविध आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागत असल्याच्या खर्चाबद्दल महानगरपालिकेकडे तक्रार करावी लागली होती. वाहन चालवण्याची समस्या सोडवण्यासाठी, रिक्त पदे भरण्यासाठी संघटनेकडे अशी मागणी करण्यात आली असावी. या संदर्भात, महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाचे मुख्य अभियंता विनायक भट यांच्या सभागृहात एक बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यामुळे, मुंबई महानगरपालिकेतील वाहन चालकांची पदे लवकरच भरली जातील असे संकेत मिळत आहेत.

**ठाणे महानगरपालिका रोजगार कार्यालय**

ठाणे महानगरपालिकेच्या विविध विभागांतील रिक्त पदे भरली जाणार आहेत. यासाठी एक नवीन अधिकृत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. अर्ज प्रक्रियाही सुरू झाली आहे. या पदासाठी अर्ज करण्याची पद्धत ऑनलाइन असेल. केवळ ६१ जागांसाठी भरती केली जाईल. यामध्ये तीन प्रकारची पदे असतील. स्टाफ नर्स (महिला), स्टाफ नर्स (पुरुष) आणि बहुउद्देशीय कर्मचारी पदांसाठी अनुक्रमे २८, ०३, ३० जागा असतील. ठाणे महानगरपालिकेतील स्टाफ नर्स पदासाठी, नर्सिंग किंवा जीएनएम कोर्स पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी अनिवार्य आहे. बहुउद्देशीय कर्मचारी पदासाठी, १२वी विज्ञान उत्तीर्ण असणे, पॅरामेडिकल बेसिक ट्रेनिंग कोर्स किंवा सॅनिटरी इन्स्पेक्टर कोर्स पूर्ण करणे आवश्यक आहे. या पदांसाठी वयोमर्यादाही निश्चित करण्यात आली आहे. सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांसाठी वय १८ ते ३८ वर्षे असावे. शासकीय नियमांनुसार राखीव प्रवर्गातील उमेदवारांना वयोमर्यादेत ३ ते ५ वर्षांची सवलत दिली जाते.

# मुंबई लोकलमध्ये महिला सुरक्षेसाठी 'पिंक प्लॅटफॉर्म'

## प्रवासी संघटनेची मागणी

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**मुंबई :** उपनगरीय रेल्वेने दररोज प्रवास करणाऱ्या लाखो महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने 'पिंक प्लॅटफॉर्म' ही नवी संकल्पना समोर आली आहे. प्रवासी संघटने रेल्वे प्रशासनाकडे यासंदर्भात लेखी प्रस्ताव सादर केला असून त्याला प्रवाशांकडून मोठा पाठिंबा मिळत आहे. महिलांचा डबा नेमका कुठे थांबणार हे सहज ओळखता यावे आणि महिलांना सुरक्षित व आरामदायी प्रतीक्षा करता यावी, या उद्देशाने मुंबई रेल प्रवासी संघाने ही संकल्पना मांडली आहे. २४ जुलै २०२६ रोजी मुंबई सीएसएमटी येथील मध्य रेल्वे मुख्यालयात झालेल्या पहिल्या उपनगरीय रेल्वे प्रवासी सल्लागार समितीच्या




(एसआरयूसीसी) बैठकीत या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. या प्रस्तावानुसार, ज्या ठिकाणी लोकलमधील महिलांचे डबे थांबतात, त्या प्लॅटफॉर्मच्या भागाला गुलाबी रंग देऊन तो स्पष्टपणे चिन्हांकित केला जाणार आहे. यामुळे महिलांना गाडी येण्यापूर्वी योग्य ठिकाणी उभे राहण्यास मदत होईल. तसेच पहिल्यांदा प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांनाही महिलांचा डबा शोधणे सोपे होणार आहे.

**सुरक्षितता आणि गर्दी नियंत्रणासाठी होणार फायदा**

'पिंक प्लॅटफॉर्म'मुळे महिलांच्या प्रतीक्षा क्षेत्रावर अधिक चांगली देखरेख ठेवता येईल, असा प्रवासी संघटनेचा दावा आहे. या भागात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे केंद्रित कव्हरेज, सुरक्षा कर्मचाऱ्यांची तैनाती आणि महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना करणे अधिक सोपे होऊ शकते. तसेच गाडीत चढण्याची प्रक्रिया अधिक शिस्तबद्ध होण्यास मदत होईल.

रेल्वे अधिकाऱ्यांनी या प्रस्तावाचे स्वागत केले असले तरी त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीतील अडचणींकडे लक्ष वेधले आहे. विविध प्रकारच्या लोकल गाड्यांमध्ये १२ डबे, १५ डबे तसेच एसी लोकलचा समावेश आहे. प्रत्येक गाडीतील महिलांच्या डब्यांची स्थिती वेगळी असल्याने हा प्रस्ताव लागू करण्यापूर्वी सविस्तर व्यवहार्यता अभ्यास आवश्यक असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

**महिलांच्या डब्यांच्या पुनर्रचनेचीही मागणी**

मुंबई रेल प्रवासी संघाने महिलांच्या डब्यांची रचनाही महिलांच्या गरजेनुसार करण्याची मागणी केली आहे. संघटनेचे उपाध्यक्ष सिद्धेश देसाई यांनी सांगितले की, महिलांचा डबा केवळ राखीव न ठेवता तो महिलांसाठी सोयीस्कर पद्धतीने तयार केला पाहिजे. पकडण्यासाठीचे हँडल, सामान ठेवण्याचे रॅक आणि इतर सुविधा महिलांच्या वापरासाठी अधिक अनुकूल असणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# मुंबईकरांवर आता CCTVची नजर, एक चूक करताच कारवाई होणार; आयुक्तांचे आदेश

प्रतिनिधी ३ ऑगस्ट

**मुंबई :** मुंबईकरांसाठी उद्यापासून काही महत्त्वाचे बदल लागू होणार आहेत. शहरभर देखरेख अधिक कडक केली जाणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तातडीने कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे घराबाहेर पडताना काही गोष्टींची विशेष काळजी घेणे आवश्यक ठरणार आहे. मुंबई शहरात स्वच्छता राखण्यासाठी मुंबई महापालिकेनं आता एक महत्त्वाचं पाऊल उचललं आहे. शहरात सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या तसेच घाण करणाऱ्यांविरोधात कडक करवाई केली जाणार आहे. आजपासून मुंबईतील सर्व 24 वॉर्डांमध्ये या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. स्वच्छता मोहीम ही अधिक यशस्वी आणि कडक करण्यासाठी ज्या ठिकाणी वारंवार कचरा साचत असेल, त्या ठिकाणी आता सीसीटीव्ही कॅमेरे सुद्धा लावण्यात येणार आहेत. कॅमेऱ्यांच्या मदतीनेच अशा ठिकाणांवर सातत्यानं लक्ष ठेवलं जाईल. जर नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांची ओळख पटली तर त्यांच्यावर तातडीने दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. मुंबईतील ज्या ठिकाणी नेहमीच कचरा साचवला जातो, अशा सर्व ठिकाणांची यादीही पालिकेनं तयार करुन ठेवली आहे. विशेष म्हणजे ही ठिकाणं गुगल मॅपवरही चिन्हांकित करण्यात आली आहेत. त्यामुळे संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांना त्या भागांवर अधिक लक्ष ठेवणं आणि त्या ठिकाणांची वेळेवर स्वच्छता करणं हे अधिक सोपं होणार आहे. मुंबई महापालिकेच्या या नव्या नियमांनुसार, उघड्यावर कचरा टाकताना किंवा सार्वजनिक ठिकाणी जर घाण करताना कोणी आढळलं तर त्या संबंधित व्यक्तीवर 200 रुपयांपासून ते 500 रुपयांपर्यंतचा दंड आकारला जाणार आहे. या कामासाठी प्रत्येक वॉर्डमधील पथके ही कारवाई करणार आहेत. खरं तर पालिकेचं म्हणणं आहे की, आपलं शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकांचं सहकार्य तितकेच महत्त्वाचे असेल, त्यामुळे प्रत्येकानेच सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणं टाळावं शिवाय सर्व स्वच्छता नियमांचं पालन करावं. या नव्या मोहिमेमुळे नक्की मुंबई अधिक स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यास मदत होईल.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ♦ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ♦ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135